जळगाव दि.२० ( प्रतिनिधी) :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये दि. २४ फेब्रुवारी रोजी मरणोत्तर नेत्रदान जागृती कार्यशाळा आणि दि. २५ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले जाणार आहे.

शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी परिपत्रक काढले असून दि. २६ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची पुण्यतिथी आहे त्या पार्श्वभूमीवर नेत्रदान जागृती आणि रक्तदान शिबिर घेण्याचे निर्देश दिले आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार दि. २४ फेब्रुवारी रोजी मरणोत्तर नेत्रदान कार्यशाळा घेतली जाणार आहे तर मंगळवार दि. २५ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात सकाळी १० वाजता रक्तदान शिबिर घेतले जाणार असल्याची माहिती रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली. रा.से.यो. एककाच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयात देखील हे उपक्रम घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२० ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष, नंदुरबार येथील जी.टी. पाटील महाविद्यालय आणि नंदुरबार जिल्हा कौशल्य रोजगार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी नंदुरबार येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

तीनही जिल्ह्यात रोजगार मेळावा घेण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.गेल्या महिन्यात विद्यापीठात हा मेळावा झाला. आता नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी रोजगार मेळावा होणार आहे. त्यासाठी ७५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून मुंबई, पुणे, नाशिक, गुजरात येथून २८ नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील पदवीधर, यापुर्वी उत्तीर्ण झालेले पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि अंतीम वर्षातील विद्यार्थी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊ शकतील अशी माहिती समन्वयक प्रा. रमेश सरदार यांनी दिली. नंदुरबार येथील जी.टी.पी. महाविद्यालयात सकाळी १० वाजता हा रोजगार मेळावा होणार असून नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, महाविद्यालयाचे प्राचार्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. महेंद्र रघुवंशी, जिल्हा कौशल्य विकास रोजगार अधिकारी विजय रिषे हे उपस्थित राहणार आहेत.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.२० ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन व करीअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होतो. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील, प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे यावेळी उपस्थित होते. देवदत्त गोखले, डॉ.विना महाजन, डॉ.कांचन नारखेडे, व डॉ.निरज देव यांनी मार्गदर्शन केले. गोखले यांनी करीअर डेव्हलपमेंट बाबत टिप्स दिल्यात. दामिनी पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. ९ ते १५ फेब्रुवारी या कलावधीत वार्षिक स्नेहसंमेलन (स्पार्क -२०२५) आयोजित करण्यात आले होते. या सप्ताहात ट्रेजर हंट, मैदानी व इनडोअर स्पर्धा, रांगोळी, ट्रॅडिशनल डे, मिसमॅच डे, हॉरर डे, फोटोग्राफी आदी स्पर्धा घेण्यात आल्या. शेवटच्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाला भरतनाट्यम विशारद स्नेहा जोशी, राजेश बगे उपस्थित होते. अशी माहिती संचालक प्रा. मधुलिका सोनवणे यांनी दिली.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५     दि. २० फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी